**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT – 4 (2022-23)**

**GRADE: IV** **MARKS: 40**
**SUB: MARATHI** **TIME: 2 HRS**

**प्रश्न १. खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

**रोहन** - ईशा , आज तू डब्यात काय आणलं आहेस?
**ईशा** - हे बघ मज्जा, मी आज पिझ्झा आणलाय.
**सावनी** - हो न खरचं धमाल मज्जा आहे ईशा तुझी! ईशाचा डबा नेहमी छान असतो कधी बर्गर, कधी केक, कधी पिझ्झा, ए शेअर करू यां आपापला डबा?
**ईशा** - हो ऽऽ चालेल नं, मी खूप आणलय आपण सगळेच खाऊ शकतो.
**रोहन** - पण माझ्या डब्यात आज भाजी पोळी आहे चालेल कां तुम्हांला?
(ईशाचे हे बोलण ऐकून रोहन हिरमुसला होतो. मधली सुट्टी संपते टिचर वर्गात येतात.)
**बाई** - मुलांनो आज आपण 'आहार' या विषयी शिकणार आहोत त्यातही भाज्या व त्या खाण्यापासून मिळणारे फायदे. सांगा बर, तुम्हांला कोणकोणत्या भाज्या खायला आवडतात.
**सावनी** - बाई, खरं तर मला फक्त बटाट्याची भाजी खायला आवडते.

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**
१. हे बघ मज्जा, मी आज ------------------ आणलाय.
२. मुलांनो आज आपण --------------- या विषयी शिकणार आहोत
३. ईशाचे हे बोलण ऐकून रोहन --------------- होतो.

**आ) खालील वाक्य कोण म्हणाले ते लिहा.**
१. पण माझ्या डब्यात आज भाजी पोळी आहे चालेल कां तुम्हांला?
२. हो न खरचं धमाल मज्जा आहे ईशा तुझी!
३. तुम्हांला कोण कोणत्या भाज्या खायला आवडतात.

**प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४ गुण)**
१. काळजी –
२. गर्व –

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**
१. शेळीला किती पिल्ले आहेत?
२. कोणता दिवस 'खाऊ दिवस' ठरला?
३. कोल्हेबुवांना काय झाली?

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२ गुण)**
१. पोपटरावांनी कशाच्या भरपाईचे बिल फाडले?
२. पिल्लांनी पोत्यामध्ये काय टाकले?

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४ गुण)**
१. कोल्ह्याला गर्व का झाला आणि त्यांने काय केले?
२. दार उघडण्यासाठी शेळीने पिल्लांना काय सांगितले?

**प्रश्न ६. खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

एका गावात गंगा नावाची आजी राहत होती. गंगाआजीला जवळचे नात्याचे असे कोणीच नव्हते. तिला फक्त एकच नातलग, ती म्हणजे यमुना. गंगाआजीची गाय.

गंगाआजीजवळ शेत नव्हते, त्यामुळे यमुनाचं आजीचे पोट भरायची. आजी रानात जायची. गवत आणायची. यमुनेला घालायची. मग यमुना भरपूर दूध द्यायची. गंगाआजी ते विकायची. मिळालेल्या पैशांत घर चालवायची.

गंगा आजीचे यमुनेवर खूप प्रेम होते. ती यमुनेला आंजारायची, गोंजारायची, 'यमुने, ये, म्हणून बोलवायची. गवत खाऊ घालायची. यमुनेचे पोट भरले, की मगच गंगाआजी दोन घास खायची.

**अ) खालील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ उताऱ्यातून शोधून लिहा.**

१. Grandmother - २. Village- ३. Cow-

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. गंगाआजीच्या गाईचे नाव काय होते?
२. यमुनेवर कोण प्रेम करत होते?
३. गंगाआजीजवळ काय नव्हते?

## व्याकरण विभाग

**प्रश्न ७. अ) खालील अंक अक्षरात लिहा.** **(२ गुण)**

१. ५२ - २. ६६ -

**आ) खालील वाक्यांतील क्रियापद ओळखा व लिहा.** **(३ गुण)**

१. आकाशात पक्षी उडतात.
२. कोकिळा गाणे गाते.
३. मीरा अभ्यास करते.

**इ) खालील शब्दांचे लिंग बदला.** **(३ गुण)**

१. बैल – २. मामा – ३. शिक्षिका -

**ई) खाली कंसात दिलेल्या शब्दांचे लिंग बदलून वाक्य परत लिहा.** **(२ गुण)**

१. ती (बोका) सकाळपासून पिलाला शोधत होती.
२. ( लांडोर ) पिसारा फुलवून नाचतो.

## लेखनविभाग

**प्र ८. अ) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहून अर्थपूर्ण कथा तयार करा. (५ गुण)**

( गर्व, अपमान, कॅक्टस, गुलाब, कोरडी, लाज, चिमणी, रोपट्यांनी, मैत्रीमुळे, दयाळू )

### गर्विष्ठ गुलाब

एकदा एक ---------- होता, त्याला आपल्या सौंदर्यावर खूप ----------- होता. त्याला एकच दुःख होते की तो काटेरी ---------- शेजारी वाढत होता. दररोज गुलाब त्या कॅक्टसचा दिसण्यावरून ---------- करीत असे, पण कॅक्टस शांत असे, बागेतल्या इतर ------------- गुलाबाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण गुलाब स्वतःच्या सौंदर्याबद्दल खूपच जागरूक होता.

एकदा उन्हाळ्यात बागेतली झाड़े --------- पडली. गुलाब कोमेजू लागला. गुलाबाने पाहिले एक ---------- तिची चोच पाण्यासाठी कॅक्टस मध्ये डुबवत होती. गुलाबाला खूप --------- वाटली. तरीसुद्धा त्याने कॅक्टसला विचारले, "मला पण पाणी मिळेल का?" --------- कॅक्टस लगेच "हो" म्हणाला आणि त्या दोघांच्या --------- त्यांनी कडक उन्हाळ्याला तोंड दिले.

**तात्पर्य:** कोणत्याही व्यक्तीविषयी त्याच्या दिसण्यावरून मत बनवू नका.

**किंवा**

**अ) व्यायामाचे महत्त्व सांगणारे पत्र तुमच्या लहान भावाला लिहा.**

*************************************************************************